अंतरावरील उद्‌भव निवडावे लागतात किंवा विशिष्ट नैसर्गिक परिस्थितीमुळे ज्या योजनांसाठी १०० मीटर पेक्षा जास्त उंचीवर पाणी उचलावे लागणार असेल, अशा योजनांच्या बाबतीत संबंधित गावे / वाड्यांवरील लोकवर्गणीचा भार कमी करण्यासाठी शासन स्तरावर गठित करण्यात आलेल्या समितीपुढे योजनांचे प्रस्ताव सादर करण्यासाठी / मान्यतेसाठी पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

- ३ कि.मी. पुढील मुख्य पाईप लाईन, ३ कि.मी. पुढील वाढीव अंतरामुळे पंपिंग मशिनरीमध्ये करावी लागणारी वाढ आणि पुढील वाढीव अंतरामुळे आवश्यकतेनुसार ब्रेक प्रेशर टँकचा समावेश करणे यासाठीचा खर्च यासाठी १० टक्के लोकवर्गणी लागू होणार नाही.
- प्रस्तावित योजनेसाठी गावाच्या जवळपास किमान अंतरावर कोणताही खात्रीशीर उद्‌भव उपलब्ध नाही याबाबतचे संबंधित उप संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांचे प्रमाण पत्र आवश्यक आहे.
- सध्या या योजनेतील समाविष्ट गावांमध्ये अस्तित्वात असलेल्या पाणी पुरवठा उपाययोजनांकरिता ग्रामपंचायती आवश्यक त्या प्रमाणात पाणी पट्टी आकारित आहेत व वसूली होत आहे व प्रस्तावित योजना कार्यान्वित झाल्यावर या योजनेची संपूर्ण देखभाल दुरुस्ती करण्यात व त्यानुसार आकारण्यात येणारी पाणीपट्टी भरण्यास तयार असल्याबाबतचा संबंधित ग्रामपंचायतींचा ठराव सोबत सादर करण्यात यावा.
- लोकवर्गणी भरण्यापासून सूट ही केवळ ३ कि.मी. च्या पुढील मुख्य पाईप लाईन, ब्रेक प्रेशर टँक, ३ कि.मी. च्या पुढील अंतरासाठी पंपिंग मशिनरीमध्ये करावी लागणारी वाढ यासाठी अनुज्ञेय आहे.
- उर्वरित सर्व उपांगावरील खर्चाच्या १० टक्के इतकी लोकवर्गणी भरण्यास ग्राम पंचायतीची तयारी असावी.

जिल्हा परिषदांकडून लोकवर्गणी मध्ये सूट देण्यासाठी प्राप्त होणाऱ्या प्रस्तावास पुढील अटींच्या

अधीन राहून समितीकडून जिल्हा परिषदेस सहमती कळविण्यात येईल.

१. या शासन निर्णयाच्या दिनांकानंतर प्रशासकीय मान्यता मिळालेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजना लोकवर्गणीत सूट मिळण्यास पात्र असतील.

२. या शासन निर्णयाच्या दिनांकानंतर सुधारित प्रशासकीय मान्यता मिळालेल्या योजनांचा विचार करण्यात येणार नाही.

३. या शासन निर्णयाच्या दिनांकापूर्वी प्रशासकीय मान्यता मिळालेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचा पुनर्विचार करता येणार नाही.

४. प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांसाठी ज्या प्राधिकाऱ्यांनी तांत्रिक मान्यता दिली असेल, त्या प्राधिकाऱ्यानी काळजीपूर्वक शहानिशा व पडताळणी करून समितीस प्रस्ताव सादर करावा.

५. शासन स्तरावर मान्यतेसाठी प्राप्त योजना स्वयंसंतुलित आहे याची समितीकडून खातरजमा करण्यात येईल. स्वयंसंतुलित नसणाऱ्या योजना नाकारण्यात येतील.

६. योजना पूर्ण झाल्यानंतर संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने योजना हस्तांतरीत करून घेणे बंधनकारक राहील. त्या आशयाचा ठराव प्रस्तावासोबत आवश्यक आहे.

७. योजना सुरळीत चालू राहण्यासाठी आणि स्वयंसंतुलित होण्यासाठी पाणीपट्टीच्या दरात टप्प्या-टप्प्याने वाढ करणे अनिवार्य राहील.

वरील सूचना या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अंमलात येतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१००७०२१८३५३९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-

**(श्री. श्री. घोलप)**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव,

मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव

विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर
सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई
मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७

केंद्र शासन पुरस्कृत जलमणी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठीची कार्यपद्धती निश्चित करण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन परिपत्रक क्र. ग्रापाधो-१११०/ प्र.क्र.१९६/पापु-०७
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १ ऑक्टोबर, २०१०.

**वाचा :-**

१) शासन निर्णय, पापुवस्ववि, क्र. डब्ल्युक्युएम २००८/प्र.क्र.०६८/पापु-१२, दि.०३ नोव्हेंबर,२००८.

२) शासन निर्णय, पापुवस्ववि, क्र. ग्रापाधो १११०/प्र.क्र.०५०/पापु-०७, दि.०३ मार्च,२०१०.

**प्रस्तावना :-**

ग्रामीण शाळांमध्ये पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध व्हावे यासाठी केंद्र शासनाने सन २००८ मध्ये जलमणी कार्यक्रम घोषित केला. त्यानुसार, ग्रामीण शाळांमध्ये या कार्यक्रमांतर्गत जलशुद्धीकरण सयंत्रे बसविण्याची प्रक्रिया राज्यात सुरु आहे.

२. सद्यस्थितीत, जलमणी कार्यक्रमाची अंमलबजावणी राज्यस्तरावरून पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून तर कार्यक्रमाचे सनियंत्रण विभागीय भारत निर्माण कक्ष, नागपूर यांचेकडून करण्यात येते. मात्र, जलमणी कार्यक्रमांतर्गत ग्रामीण शाळांमध्ये जलशुद्धीकरण संयंत्रे बसविण्यासाठी प्रशासकीय स्तरावर शालेय शिक्षण विभाग व जिल्हास्तरावर जिल्हा परिषदा तसेच शिक्षणाधिकारी यांचेमध्ये या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसंदर्भात योग्य तो समन्वय राहत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे.

३. जलमणी कार्यक्रमाचा आढावा मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय समितीमार्फत दि.१६ जुलै,२०१० रोजी घेण्यात आला. यामध्ये, जलमणी कार्यक्रमाची अंमलबजावणी, शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या सहकार्याने करण्यात यावी आणि कार्यक्रमाच्या प्रभावी संनियंत्रणासाठी जिल्हा स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ्यांचे अध्यक्षतेखाली समितीची स्थापना करण्यात यावी असे निर्णय घेण्यात आले.

४. त्याअनुषंगाने, प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि. २४ ऑगष्ट, २०१० रोजी प्रधान सचिव,शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचेसमवेत बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये जलमणी कार्यक्रमाची अंमलबजावणी पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग व शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या संयुक्त सहकार्याने करण्यासंदर्भात सविस्तर चर्चा होऊन या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीकरीता अधिक परिणामकारक कार्यपद्धती विहित

करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याअनुषंगाने सुचना देण्यासाठी शासन परिपत्रक निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :-**

आर्थिक वर्ष सन २०१०-११ पासून केंद्र पुरस्कृत जलमणी कार्यक्रमाची अंमलबजावणी पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग व शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या संयुक्त सहभागाद्वारे करण्यात यावी. या कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीचे अनुषंगाने विविध जबाबदा-या पार पाडण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यपद्धती विहित करण्यात येत आहे.

२. राज्यस्तरावरील शालेय शिक्षण व क्रिडा विभागाकडून प्रत्येक जिल्हयातील ग्रामीण शाळांमधील पिण्याच्या पाणी पूरवठा व्यवस्थेची तसेच या शाळांमध्ये उपलब्ध पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता विषयक माहिती संकलीत करून, त्यानुसार जलमणी संयंत्रे बसविण्याकरिता जिल्हानिहाय शाळांची यादी तयार करण्याची कार्यवाही करण्यात यावी व ही यादी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

३. शालेय शिक्षण व क्रिडा विभागाकडून प्राप्त माहितीच्या आधारे, शाळांमध्ये बसवावयाच्या जलशुद्धीकरण संयंत्राची निवड (सयंत्रांची वर्गवारी व पाणी गुणवत्ता निहाय) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून करण्यात यावी.

४. जलमणी कार्यक्रमांतर्गत जलशुद्धीकरण सयंत्रे खरेदी करण्यासाठी संदर्भ क्र. ०२ येथील शासन निर्णयान्वये विभागीय खरेदी समितीची स्थापना केलेली आहे. आता या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचा सहभाग राहणार असल्यामुळे, सदर शासन निर्णय अधिक्रमित करून पुढीलप्रमाणे समिती नव्याने गठीत करण्यात येत आहे :

| | |
|---|---|
| १.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | अध्यक्ष |
| २.प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग | सदस्य |
| ३.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | सदस्य |
| ४.उप सचिव,वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई | सदस्य |
| ५.प्रकल्प संचालक, सर्व शिक्षा अभियान | सदस्य |
| ६.उद्योग सहसंचालक | सदस्य |
| ७.मुख्य अभियंता, राज्यस्तरीय भारत निर्माण कक्ष | सदस्य |
| ८.उप सचिव (पापु-०७) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | सदस्य सचिव |

५. आर्थिक वर्ष २०१०-११ पासून पुढे दरवर्षी जलमणी कार्यक्रमांतर्गत बसवावयाच्या जलशुद्धिकरण संयंत्रांचे दरकरार उद्योग ,उर्जा व कामगार विभागाकडून निश्चित करण्यात यावेत.

६. जलमणी कार्यक्रमाच्या जिल्हास्तरावरील अंमलबजावणीसाठी जिल्हा परिषद स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे समिती गठीत करण्यात यावी :

| | |
|---|---|
| १) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | अध्यक्ष |
| २) शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद | सदस्य |
| ३) शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद | सदस्य |
| ४) उप शिक्षणाधिकारी (सर्व शिक्षा अभियान) | सदस्य |
| ५) कार्यकारी अभियंता ग्रा.पा.पू विभाग, जिल्हा परिषद | सदस्य सचिव |

७. जिल्हा स्तरीय समितीची जबाबदा-या खालील खालीलप्रमाणे राहतील-

१) निवडल्या गेलेल्या पुरवठादार कंपन्यांना जिल्हानिहाय शाळांची यादी पुरविणे. २) या पुरवठादारांकडून संबंधित शाळांमध्ये संयंत्रे बसवून घेणे, त्यांचे संनियंत्रण करणे.

३)पुरवठादारांकडून जलशुद्धीकरण संयंत्राची उभारणी करून घेणे, जलशुद्धीकरण संयंत्राची दैनंदीन देखभाल व संयंत्राद्वारे पाणी पुरवठा सुरळीत सुरु राहील याबाबतची खात्री संबंधित शाळेचे मुख्याध्यापक व ग्राम शिक्षण समितीच्या माध्यमातून करणे.

४)ग्राम शिक्षण समिती व संबंधित शाळांचे मुख्याध्यापक यांच्यामार्फत कार्यक्रमाच्या भौतीक प्रगतीची माहिती घेऊन ती जिल्हास्तरावरील समितीस तसेच शासनास सादर करणे

८. संबंधित कंपन्यांकडून बसविलेल्या जलशुद्धीकरण संयंत्राची चाचणी घेऊन ती कार्यान्वित करण्याबाबतची व तसे प्रमाणित करण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद यांची राहील.

९. शाळांमध्ये बसविण्यात आलेल्या जलशुद्धीकरण संयंत्रातून उपलब्ध होणा-या पाण्याची गुणवत्ता चाचणी Field Test Kits (FTKs) मार्फत करण्यात यावी. FTKs ची खरेदी शालेय शिक्षण व क्रिडा विभागामार्फत करण्यात यावी.

**१०. जलशुद्धीकरण सयंत्रांची देखभाल दुरुस्ती :**

जलशुद्धिकरण संयंत्रांची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी शाळेचे मुख्याध्यापक / ग्राम शिक्षण समिती यांची राहिल.यामध्ये खालील बाबींचा समावेश राहिल-

१) संयंत्र दररोज चालवून शुध्द पाणी संयंत्रासोबत असलेल्या पाण्याच्याटाकीमध्येसाठवणे व योग्य रित्या विद्यार्थ्यांना वितरीत होईल याची काळजी घेणे.

२) संयंत्रामध्ये बिघाड झाल्यास संयंत्र बसविणा-या कंपनीच्या प्रतिनिधीस बोलावून त्यांचेकडून दुरूस्त करून घेणे.

३) कंपनीमार्फत संयंत्राची देखभाल दुरूस्ती वर्षभर कशाप्रकारे झाली याचा अहवाल वर्ष अखेर सादर करणे.

४) देखभाल दुरूस्तीचे देयक देण्याबाबत अभिप्राय देणे.

११. जलमणी कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त होणारा निधी, संयंत्रांच्या किमतीनुसार संबंधित जिल्ह्यांच्या सर्व शिक्षा अभियानच्या खात्यामध्ये जमा करण्यात यावा.

१२. जिल्हा शिक्षणाधिका-यांनी ग्रामीण शाळांमध्ये जलशुद्धीकरण सयंत्रे बसविण्यात आल्याची व ती व्यवस्थित चालू असल्याची खात्री करुन, तशा आशयाची प्रमाणपत्रे संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकांकडून प्राप्त करून संबंधित पुरवठादारांना देयके अदा करावीत. निधीची उपलब्धता व वितरण याबाबतची तपशीलवार माहिती शिक्षणाधिकारी यांनी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद यांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवावी.

१३. जलमणी कार्यक्रमांतर्गत जलशुद्धीकरण संयंत्रे बसविण्याकरीता निवडण्यात आलेल्या शाळा, बसविण्यात आलेली संयंत्रे व निधी वितरण याची माहिती ऑनलाईन भरण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद यांची राहील.

१४. हे शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेब साईट www.maharashtra.gov.in वर टाकण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक **क्र. २०१०१००४१३५५२६००१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

सही/-
(डॉ. निपुण विनायक )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व)
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,मंत्रालय मुंबई
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
जिल्हाधिकारी, (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (सर्व)
अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परिक्षा)
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परिक्षा)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर
प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा(सर्व)
जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
तहसीलदार (सर्व)
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, (सर्व)
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई
मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७.

**राज्य स्तरावर ग्रामिण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पाणी पुरवठा व स्वच्छता सहाय्य संस्था(WSSSO) स्थापन करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन शुध्दिपत्रक क्र.ग्रापाधो-११११/प्र.क्र.८/पापु-०७**
मंत्रालय,मुंबई - ४०० ०३२ ,दि. १७ जानेवारी,२०११

**वाचा-** शासन निर्णय,पा.पु.व.स्व.वि.क्र.ग्रापाधो-११०९/प्र.क्र.११६/पापु-०७,
दि.२५ ऑगस्ट, २००९

**प्रस्तावना :**

संदर्भाधिन शासन निर्णयान्वये ग्रामिण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी पाणी पुरवठा व स्वच्छता सहाय्य संस्थेची (WSSSO) स्थापना करण्यात आली आहे.सदर शासन निर्णयातील परि.१४ मध्ये महाराष्ट्र राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता संस्था नोंदणीकृत झाल्यानंतर सध्या कार्यरत असलेल्या सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष(R$PMU),संवाद क्षमता व विकास कक्ष (CCDU),आपलं पाणी (KFW) व भारत निर्माण कक्ष हे सर्व कक्ष या नोंदणीकृत संस्थेत विलिन करण्यात येतिल व त्यातील कार्याक्षम अधिकारी/कर्मचारी यांना आवश्यकतेनुसार विलिन करण्यात येईल, अशी तरतूद करण्यात आली आहे.तथापि ग्राम विकास मंत्रालय,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,भारत सरकार यांचे पत्र क्र.W-११०४२/७२/२००९-water, दि. २४ ऑगस्ट,२०१० अन्वये देण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार पाणी पुरवठा व स्वच्छता सहाय्य संस्थेवरिल अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या अध्यक्षते खालील राज्य स्तरीय निवड समितीने करावयाची आहे. त्याअनुषंगाने संदर्भाधिन शासन निर्णयातील परि.क्र.१४ रद्द करुन तो सुधारीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन शुध्दपत्रक-**

उपरोक्त प्रस्तावनेतील माहिती विचारात घेता संदर्भाधिन शासन निर्णयातील परि.क्र.१४ रद्द करुन तो खालील प्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे-

**परिच्छेत १४-अ)** पाणी पुरवठा व स्वच्छता सहाय्य संस्था (WSSSO) नोंदणीकृत झाल्यानंतर सध्या कार्यरत असलेल्या सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (RSPMU),संवाद क्षमता व विकास कक्ष (CCDU),आपलं पाणी (KFW) व भारत निर्माण कक्ष हे सर्व कक्ष WSSSO या नोंदणीकृत संस्थेत

विलिन करण्यात येतील. पाणी पुरवठा व स्वच्छता सहाय्य संस्था (WSSSO) या संस्थेवरील कर्मचारी/अधिकारी यांची नियुक्ती ग्राम विकास मंत्रालय,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,भारत सरकार यांचे पत्र क्र.W-११०४२/७२/२००९-water, दि.२४ ऑगस्ट, २०१० अन्वये देण्यात आलेल्या निर्देशांप्रमाणे करण्यात येईल..

ब) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार पाणी पुरवठा व स्वच्छता सहाय्य संस्थेवरील पदे भरण्याकरीता शासन स्तरावर खालील प्रमाणे निवड समिती स्थापन करण्यात येत आहे-

१) प्रधान सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग - अध्यक्ष

२) उप सचिव(पापु-०७), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग - सदस्य

३) प्रकल्प व्यवस्थापक, सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष - सदस्य

४) संचालक,भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा - सदस्य

५) केंद्र शासनाचे २ प्रतिनिधी - सदस्य

६) सदस्य सचिव,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण - सचिव

७) संचालक, पाणी पुरवठा व सहाय्य संस्था(इतर कर्मच्या-यांकरीता) - सदस्य

८) कक्ष अधिकारी,(पापु -०७),पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, - सदस्य सचिव

सदर शासन शुद्धपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब-साईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०११०११७१८४४२६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-

(प्राजक्ता लवंगारे-वर्मा)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
मा.मंत्री(पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्य मंत्री(पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव,
सर्व विभागीय आयुक्त,
सदस्य सचिव,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई
संचालक,भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे,
मुख्य कार्यकारी अधिकारी,सर्व जिल्हा परिषदा
सर्व अधिक्षक अभियंता,विभागीय भारत निर्माण कक्ष

D:\2011\GR-2011\CR 008-11 170111.doc

सर्व कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
सर्व कार्यकारी अभियंता,ग्रामिण पाणी पुरवठा विभ ाग,जिल्हा परिषद
महालेखापाल,महाराष्ट्र - १ मुंबई(लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल,महाराष्ट्र - २ नागपूर (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परिक्षक,स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
उप मुख्य लेखा परिक्षक,स्थानिक निधी लेखा, नाशिक,पुणे,औरंगाबाद,अमरावती व नागपूर
सर्व प्रादेशिक उपसंचालक,भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
मुख्य अभियंता,भारत निर्माण कक्ष,नवी मुंबई
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व गट विकास अधिकारी,पंचायती समिती
नियोजन विभाग,मंत्रालय,मुंबई
वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय,मुंबई
पाणी पुरवठा विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवड नस्ती,पापु-०७

**ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी सुधारित मार्गदर्शक सूचना..**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन शुध्दिपत्रक, क्रमांक ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४(अ)/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक : ३१ जानेवारी, २०११**

**वाचा :-** १) शासन निर्णय समक्रमाकं, दि. १७ मार्च, २०१०
२) शासन शुध्दिपत्रक समक्रमाकं, दि. ३० ऑगस्ट, २०१०

**प्रस्तावना :**

केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शक सुचनांनुसार ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाची अंमलबजावणी अधिकाधिक परिणामकारक व्हावी व शासनाच्या मागणी आधारित लोकसहभागाच्या धोरणाची ती अधिक सुसंगत असावी यावी म्हणून संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता. संदर्भ क्र. २ येथील शासन शुद्धीपत्रकान्वये या शासन निर्णयाच्या परिच्छेद २.३ व ११ मध्ये सुधारणा देखील करण्यात आली होती.

परिच्छेद क्र. ११ मध्ये सुधारणा करताना लोकवर्गणी जमा करण्याच्या शासन स्थायी आदेशांच्या तरतूदीमध्ये विसंगती झाल्याचे शासनाच्या निदर्शनास आल्याने त्यास सूधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन शुध्दिपत्रक :**

संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयातील परिच्छेद क्र. **११** पुढीलप्रमाणे वाचण्यात यावा.

**११.** सर्वसाधारण क्षेत्रासाठी किमान ५ टक्के व दलित तसेच आदिवासी क्षेत्रासाठी किमान १ टक्के लोकसहभागाची रोख रक्कम ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा, स्वच्छता व पर्यावरण समितीच्या खात्यावर रोखीने जमा केल्यानंतर शासन सहभागाच्या रकमेपैकी ३० टक्के निधी पहिला हप्ता म्हणून समितीच्या खात्यावर जमा करण्यात येईल. ह्या निधीतून समितीने केवळ स्त्रोत विकासाचे काम हाती घ्यावे व पूर्ण करावे. स्त्रोताच्या सक्षमतेबाबत भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे योग्यता प्रामाणपत्र घेतल्यानंतरच इतर कामे हाती घ्यावीत. उर्वरित लोकवर्गणीच्या रकमेपैकी सर्वसाधारण क्षेत्रासाठी ५ टक्के व दलित व आदिवासी क्षेत्रासाठी ४ टक्के लोकसहभागाची रक्कम परिस्थितीनुरूप रोखीने किंवा श्रमदान / वस्तुदानाद्वारे जमा केल्यानंतर दुस-या हप्त्याची ३० टक्के रक्कम देण्यात यावी. या रकमेचा पूर्ण विनियोग झाल्यानंतर ३० टक्केचा तिसरा हप्ता वितरीत करण्यात यावा. उर्वरित १० टक्के निधी योजना पुढील १ वर्ष सुरळीत चालविल्यानंतर समितीस अदा करण्यात येईल.

D:\2011\GR-2011\CR104(A) 09 RWS Policy Modification GR. 291111.doc

२.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०११०१३१११६१०५९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सही/-**
(प्राजक्ता लवंगारे- वर्मा)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रत,**

*मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव,*

*मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव*
*विभागीय आयुक्त (सर्व)*
*सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई*
*संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे*
*सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद*
*सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,*
*सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण*
*सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद*
*महालेखापाल, महाराष्ट्र - १, मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)*
*महालेखापाल, महाराष्ट्र - २, नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)*

*मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई*
*उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर*
*प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा सर्व*
*प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सर्व*
*जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा सर्व*
*कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सर्व*
*गट विकास अधिकारी, पंचायत समिती सर्व*
*नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई*
*वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,*
*ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई*
*मंत्रालयातील इतर सर्व विभाग,*
*पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने*
*निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७*

D:\२०११\GR-२०११\CR१०४(A) ०९ RWS Policy Modification GR २९१११९.doc

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाची धोरण निश्चिती,अंमलबजावणी व संनियंत्रण यासाठी राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनची (State Water & Sanitation Mission) स्थापना..

----

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय, क्र. ग्रापाधो-१११०/ प्र.क्र.१७५(ब)/पापु-०७
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १० फेब्रुवारी, २०११

**वाचा :-**

१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. ग्रापापु-१००४/ प्र.क्र. ४७/ पापु-०७, दि. २ एप्रिल, २००४
२) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. ग्रापाधो-११०९/प्र.क्र. १७५/ पापु-०७, दि. १० नोव्हेंबर, २००९.
३) संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० चा अधिनियम २१) खाली सहाय्यक संस्था निबंधक, मुंबई यांचे नोंदणी प्रमाणपत्र क्र. महाराष्ट्र राज्य, मुंबई ३९८/२०१०/ जीबीबीएसडी, दि. १०फेब्रुवारी, २०१०.

**प्रस्तावना :-**

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी, केंद्र शासनाने सन २००८ मध्ये नव्याने मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. राज्य शासनाने दि. १ एप्रिल, २००९ पासून या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची अंमलबजावणी राज्यात सुरु केलेली आहे.

२. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची राज्यात अंमलबजावणी करण्यासाठी राज्य स्तरावर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन ही संस्था निर्माण करुन ती संस्था नोंदणी कायदयाखाली नोंदविणे अभिप्रेत होते. राज्य शासनाने यापूर्वी केंद्र पुरस्कृत स्वजलधारा कार्यक्रमाच्या संनियंत्रणासाठी व धोरणात्मक बाबींसाठी राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनची स्थापना संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये केली होती. मात्र, या संस्थेची नोंदणी कायद्याखाली नोंदणी करण्यात आलेली नव्हती.

३. केंद्र शासनाच्या नव्या मार्गदर्शक सूचना विचारात घेवून वरीलप्रमाणे स्थापन केलेल्या राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनची व्याप्ती वाढविणे, तिच्या कार्यकक्षा व जबाबदाऱ्या निश्चित करणे तसेच तिची संस्था नोंदणी कायदयाखाली नोंदणी करणे देखील गरजेचे होते. त्यानुसार राज्य शासनाने राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनची संस्था नोंदणी

अधिनियम १८६० खाली नोंदणी करण्याचा निर्णय संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये घेतला. तर संदर्भ क्र. ३ येथील नोंदणी प्रमाणपत्राद्वारे राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनच्या नोंदणीची प्रक्रिया पूर्ण केलेली आहे.

४. संस्था नोंदणी कायदयाखाली नोंदणीकृत केलेल्या राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनकडून राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार धोरण निश्चिती व संनियंत्रण करण्यासाठी तिची रचना, उद्देश, कार्यपध्दती व अधिकार निश्चित करण्यात आलेले आहेत. त्यास अनुसरुन राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनची रचना, कार्यकक्षा व उद्दीष्ट या बाबी संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

केंद्र पुरस्कृत स्वजलधारा योजनेच्या अंमलबजावणीसाठी संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आलेल्या राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनच्या (State Water & Sanitation Mission) रचना, कार्ये व उद्दीष्टांमध्ये केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने आवश्यक ते बदल करून तिची धेय्य, उद्दीष्टे व कार्ये, शिखर समिती तसेच कार्यकारी समितीच्या रचना व कार्यकक्षा खालील प्रमाणे सुधारित करण्यात आलेल्या येते.

२. राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे विहित करण्यात आलेली आहेत :-

- २.१ राज्यातील ग्रामीण व नागरी पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार धोरण निश्चित करणे.
- २.२ पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाशी निगडीत राज्य शासनाचे विविध प्रशासकीय विभाग व अंलबजावणीतील सहाय्यकारी संस्था यामध्ये समन्वय ठेवणे.
- २.३ कार्यक्रमाच्या परिणामकारक अंमलबजावणीस गती देण्यासाठी व तो एकात्मिकरित्या राबविण्यासाठी योग्य ती कार्यात्मक लवचिकता असलेल्या धोरणाची आखणी करणे.
- २.४ पाणी पुरवठा, स्वच्छता व सहाय्यकारी संस्था (WSSSO) व राज्यस्तरीय योजना मंजूरी समिती (SLSC) यांच्या कामकाजाचा आढावा घेणे.

३. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाचे राज्यस्तरावरील संचालन, निधी वितरण, मार्गदर्शन, संनियंत्रण ही अपेक्षीत कर्तव्ये व जबाबदा-या पार पाडण्यासाठी, राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनमध्ये राज्य शिखर समिती (Governing committee) व कार्यकारी समिती (Executive committee) पुढीलप्रमाणे गठीत करण्यास शासन मान्यता देत आहे :-

३.१ **राज्य शिखर समिती**

(अ) राज्य शिखर समितीची रचना पुढीलप्रमाणे असेल :-

| | | |
|---|---|---|
| (१) मा. मुख्य सचिव | - | अध्यक्ष |
| (२) सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | - | सदस्य सचिव |
| (३) सचिव, वित्त विभाग | - | सदस्य |
| (४) सचिव, नियोजन विभाग | - | सदस्य |
| (५) सचिव, नगर विकास विभाग | - | सदस्य |
| (६) सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग | - | सदस्य |
| (७) सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग | - | सदस्य |
| (८) सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग | - | सदस्य |
| (९) महासंचालक, माहिती व जनसंपर्क | - | सदस्य |
| (१०) सचिव, पर्यावरण विभाग | - | सदस्य |
| (११) उप सचिव/ सह सचिव (पापु-७) | - | खजिनदार |
| (१२) केंद्र शासनाच्या पाणी पुरवठा विभागाचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| (१३) शासन नियुक्त पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रातील २ तज्ञ | - | सदस्य |

**(ब) राज्य शिखर समितीची कार्यकक्षा व अधिकार पुढील प्रमाणे असतील :-**

(१) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाबाबत धोरणात्मक मार्गदर्शन करणे.

(२) केंद्र शासन अथवा बाह्य सहाय्यीत संस्थांकडून पुर्णत: अथवा अंशत: अर्थसहाय्यीत ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रातील योजना विचारात घेणे व धोरणात्मक बाबी मंजूर करणे.

(३) पाणी पुरवठा व स्वच्छतेच्या विशेष प्रकल्पांसह सर्व बाबींचे संयोगीकरण (convergence) करणे.

(४) राज्य शासनाचे विविध विभाग व या कार्यक्रमातील बाबींशी संबंधित भागीदारांमध्ये समन्वय साधणे.

(५) पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाचे भौतिक व आर्थिक व्यवस्थापन आणि प्रगतीचे मुल्यमापन व संनियंत्रण करणे.

(६) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या बांधकामाच्या गुणवत्तेचे स्वतंत्रपणे प्रमाणीकरण करण्याची व्यवस्था करणे.

(७) पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमासाठी माहिती, शिक्षण, व संवाद आणि क्षमता बांधणी कार्यक्रमांना एकत्रित करून संचालित करणे.

(८) पाणी पुरवठा,स्वच्छता व सहाय्यकारी संस्था व राज्यस्तरीय योजना मंजूरी समिती यांच्या कामकाजाचा आढावा घेणे.

**(क) राज्य शिखर समितीच्या बैठका**

राज्य शिखर समितीची बैठक दर सहा महिन्यांनी व आवश्यकतेनुसार घेण्यात यावी.

३.२ **कार्यकारी समिती**

**(अ) राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनअंतर्गत राज्य शिखर समितीस सहाय्य करण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यकारी समिती असेल :**

| | | |
|---|---|---|
| (१) सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | - | अध्यक्ष |
| (२)सह सचिव/ उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | - | सदस्य सचिव |
| (३) व्यवस्थापकीय संचालक, पाणी पुरवठा, स्वच्छता व सहाय्यकारी संस्था | - | सदस्य |
| (४) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा | - | सदस्य |
| (५) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | - | सदस्य |
| (६) उपसंचालक, माहिती व जनसंपर्क | - | सदस्य |
| (७) मुख्य अभियंता व सह सचिव, पा.पु.व स्व.वि. | - | सदस्य |
| (८) उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग | - | सदस्य |
| (९) उप सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग | - | सदस्य |
| (१०) उप सचिव, सामाजिक न्याय विभाग | - | सदस्य |
| (११) उप सचिव, नियोजन विभाग | - | सदस्य |
| (१२) उप सचिव, वित्त विभाग | - | सदस्य |
| (१३) उप सचिव (पं.रा.), ग्राम विकास व जलसंधारण विभाग | - | सदस्य |
| (१४) पाणी पुरवठा, ग्राम विकास, सामूहिक आरोग्य, स्वच्छता सामुदायिक संघटना, प्रसार माध्यमे व सेवाभावी संस्था अशा क्षेत्रातील तज्ञ (६) | - | स्वीकृत सदस्य |

**(ब) कार्यकारी समितीची कार्यकक्षा पुढील प्रमाणे असेल :-**

(१) ही समिती राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनची कार्यकारी स्वरुपाची समिती असेल.

(२) मिशनच्या राज्य शिखर समितीला सहाय्य करणे व सल्ला देणे.

(३) राज्य पाणी पुरवठा,स्वच्छता व सहाय्यकारी संस्थेच्या पदांसाठी नियम, अर्हता,अनुभव निश्चित करणे व त्यानुसार प्रशासकीय आणि तांत्रिक अधिकारी / कर्मचारी वर्गाची निवड करुन नियुक्ती करणे.

(४) मिशनच्या आर्थिक परिस्थितीवर नियंत्रण ठेवून तिचे कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी आवश्यक त्या सर्व भौतिक व आर्थिक उपाययोजना करणे.

(५) मिशनची कर्तव्ये/ प्रकल्प पार पाडण्यासाठी तसेच कार्याचे मुल्यमापन करण्यासाठी प्रसंगी मिशन बाहेरील तज्ञांचे पॅनल तयार करणे, त्यांचेकडून मिशनचे कालबद्ध मुल्यमापन करून घेणे.

(६) शिखर समितीकडून प्रत्यायोजित अधिकारांप्रमाणे अंमलबजावणी करणे.

**(क) कार्यकारी समितीची बैठक :**

प्रत्येक चारमाहीमध्ये किमान एक बैठक घेण्यात येईल.

४. हे आदेश राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनच्या दि.१६ जुलै,२०१० रोजीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेब साईट www.maharashtra.gov.in वर टाकण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०११०२११२१०३३५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

सही/-
(प्राजक्ता लवंगारे-वर्मा)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व)
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,मंत्रालय मुंबई
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परिक्षा)
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परिक्षा)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व तहसीलदार
सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई
मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७.

**ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाच्या ग्रामस्तरावरील प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यातील प्रत्येक तालुक्यामध्ये गट संसाधन केंद्रांची (Block Resources Centers) स्थापना करण्याबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्र.ग्रापाधो-१११०/प्र.क्र.२५१/पापु-०७**
मंत्रालय,मुंबई - ४०० ०३२ ,दि. ६ जुलै,२०११

**प्रस्तावना :**

भारतीय राज्य घटनेच्या ७३ व्या घटना दुरुस्तीनंतर, राज्यघटनेच्या ११ व्या अनुसुचीमध्ये केलेल्या दुरुस्तीनुसार, पिण्याच्या पाण्याचा विषय आता पंचायत राज संस्थांच्या अखत्यारित आणण्यात आलेला आहे. त्यानुसार ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम राज्यामध्ये मागणी आधारित समूह सहभागाच्या धोरणानुसार राबविण्यात येतो. त्यानुसार ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत घ्यावयाच्या उपाययोजनांसाठी लोकसहभाग अनिवार्य करण्यात आलेला आहे.

२. सन २००९ मध्ये केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार, ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या धोरणामध्ये आमुलाग्र बदल करण्यात आलेला आहे. त्यानुसार, दरडोई दरदिवशी किमान पाणी पुरवठा उपलब्ध करून देण्याऐवजी, घरोघर शाश्वत नियमित पाणी पुरवठा हे उद्दीष्ट निश्चित करण्यात आलेले आहे. यासाठी प्रत्येक गाव / वाडी / वस्तीसाठी पिण्याची पाणी पुरवठा योजना निश्चित करताना, अस्तित्वातील सर्व स्त्रोतांचा सामायिक वापर, गाव कृती आराखडा तयार करणे, त्यासाठी जिल्ह्यातील सुक्ष्म पाणलोट क्षेत्रांच्या प्रत्यक्ष भू - तपासणीअंती, तयार केलेल्या नकाशांच्या आधारे स्त्रोतांची निवड करणे, योजनेची आखणी करताना, स्त्रोत शाश्वतीकरण उपाययोजना घेणे अनिवार्य करण्यात आलेले आहे. त्यासाठी आवश्यक त्या मार्गदर्शक सूचना देखील निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

३. केंद्र पुरस्कृत संपूर्ण स्वच्छता अभियान राज्यात मागणी आधारित राबविण्यात येते. या अंतर्गत, ग्रामीण भागात, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी प्रोत्साहन अनुदान देण्यात येते. तसेच या अभियानाअंतर्गत ग्रामीण भागात सार्वजनिक स्वच्छतागृह, शालेय स्वच्छतागृह व अंगणवाडी स्वच्छतागृहांचे बांधकाम केले जाते. शौचालयाचा नियमित वापर करून त्याची सवय लागावी यासाठी संपूर्ण स्वच्छता कार्यक्रमांतर्गत माहिती, शिक्षण व संवाद (IEC) या घटकांवर विशेष भर दिला जातो.

४. सन २००९ मध्ये केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमासाठी (NRDWP) निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी राज्यस्तरावर राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनची, जिल्हास्तरावर जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनची व तालुकास्तरावर गट संसाधन केंद्रांची स्थापना करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. त्यासाठीच्या तपशीलवार मार्गदर्शक सूचना देखील केंद्र शासनाच्या ग्रामीण पेयजल विभागाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

५. या मार्गदर्शक सूचनांनुसार, राज्यस्तरावर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनची स्थापना करण्यात आलेली आहे. या संस्थेची संस्था नोंदणी कायद्यांतर्गत नोंदणीदेखील करण्यात आलेली आहे. जिल्हास्तरावर जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनची स्थापना देखील प्रस्तावित आहे.

६. मुबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील कलम ४९ अ नुसार, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाच्या ग्राम स्तरावरील अंमलबजावणीसाठी ग्रामसभेच्या नियंत्रणाखाली ग्राम आरोग्य, पोषण, पर्यावरण, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती गठीत करण्यात आलेली आहे. बदललेल्या धोरणानुसार या समित्यांच्या जबाबदारीमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे. ही जबाबदारी पार पाडण्यासाठी या समित्यांमध्ये पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाविषयी पुरेशी जाणीव व जागरुकता निर्माण व्हावी, या जबाबदा-या पार पाडण्यासाठी त्या सक्षम व्हाव्यात, यासाठी त्यांना सहाय्य करण्यासाठी तालुका स्तरावर गट संसाधन केंद्रे स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

उपरोक्त परिस्थिती विचारात घेऊन, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाच्या ग्रामस्तरावरील अंमलबजावणीसाठी, ग्राम आरोग्य, पोषण, पर्यावरण, पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांना मार्गदर्शन व मदत करण्यासाठी, त्यांचा तालुकास्तरावरील पंचायत समित्यांशी योग्य समन्वय राखण्यासाठी, तालुकास्तरावर गट संसाधन केंद्रे (Block Resource Centers) स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

२. गट संसाधन केंद्रांची कार्यालये पंचायत समित्यांच्या कार्यालयांमध्येच स्थापन करण्यात येतील. तर, समुह समन्वयक (Cluster Coordinators) शक्य असेल नेमून दिलेल्या गावांमध्ये कार्यरत राहतील. पंचायत समिती त्यांच्या कामाचे पर्यवेक्षण व प्रशासकीय नियंत्रण करेल. जिल्हा स्तरावर गट संसाधन केंद्रांचे पर्यवेक्षण जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन (DWSM) मार्फत करण्यात येईल. पंचायत समित्यांनी तयार केलेल्या व जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनने मंजूर केलेल्या कृती आराखड्याप्रमाणेच या केंद्रांचे कर्मचारी काम करतील. प्रत्येक पंचायत समितीने त्यांच्या कार्यालयात गट संसाधन केंद्राकरीता त्याचप्रमाणे, गाव समुहाच्या ठिकाणी समुह समन्वयकांकरीता पुरेशी जागा, फर्निचर व इतर आवश्यक कार्यालयीन सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात.

३. गट संसाधन केंद्रांची कार्ये पुढीलप्रमाणे राहतील.

१) ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती (VWSC) स्थापन करण्याकरिता ग्रामस्थांना मदत करणे.

२) ग्राम पंचायत /ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे सदस्य आणि ग्रामस्थ यांच्यामध्ये पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाविषयी जाणीव व जागृती निर्माण करणे व त्यांची संवाद क्षमता विकसित करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करणे.

३) पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाच्या विविध बाबींवर, ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती / ग्राम पंचायत सदस्य तसेच ग्राम पातळीवरील विविध कार्यकर्ते (उदा.ASHA /अंगणवाडी कामगार, शिक्षक, स्वयं सहायता गट, महीला व युवक मंडळ इ.) व ग्रामस्थ यांचेमध्ये माहिती, शिक्षण व संवाद (IEC) क्षमता वाढविण्यासाठी गट व ग्राम स्तरावर प्रशिक्षणाचे वार्षिक कार्यक्रम तयार करणे व त्यांची अंमलबजावणी करणे.

४) गट संसाधन केंद्राच्या कार्यक्षेत्रातील पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत व उपाययोजनांचे व स्वच्छता विषयक उपाययोजनांचे प्राथमिक सर्वेक्षण (BASELINE SURVEY)करण्यासाठी ग्राम पंचायती व पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांना मदत करणे.

५) ग्रामस्थ, ग्राम पंचायती व पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांना वार्षिक गाव कृती आराखडा तयार करण्यासाठी व त्यास ग्राम सभेची मंजूरी मिळविण्यासाठी मदत करणे. आराखड्यामध्ये प्रस्तावित केल्यानुसार, पाणी पुरवठा योजना व स्वच्छतेच्या कामांची अंमलबजावणी व संनियंत्रण करण्याकरीता पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांना मार्गदर्शन करणे.

६) पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षण यामध्ये प्रशिक्षित झालेल्या गाव पातळीवरील कार्यकर्त्यांमध्ये समन्वय साधणे व ते पाणी गुणवत्ता चाचणी व सर्वेक्षण कार्यक्रम राबवित आहेत याची खात्री करण्यासाठी पाठ पुरावा करणे.

७) पाणी पुरवठा, पाणी गुणवत्ता तपासणी व सर्वेक्षण तसेच स्वच्छता यांच्याशी संबंधित बाबींवर नियमित लक्ष केंद्रीत केले जात आहे याची खात्री करण्यासाठी ग्राम पंचायती, ASHA /अंगणवाडी कामगार, शिक्षक,स्वयं सहायता गट, महीला व युवक मंडळे यांच्याशी नियमित संवाद साधणे.

८) शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये आरोग्य व स्वच्छता विषयक चांगल्या सवयींविषयी जाणीव निर्माण व्हावी यासाठी शाळांना भेटी देऊन आरोग्य व स्वच्छता या विषयावर व्याख्याने देणे.

९) ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांना सामाजिक लेखापरिक्षण आयोजित करण्यासाठी मदत करणे.

१०) पाणी गुणवत्ता चाचणीच्या अहवालानुसार, पाणी पिण्यायोग्य ठेवण्यासाठी परिणामकारक उपाययोजना करणे याबाबत ग्राम पंचायती/ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती / सार्वजनिक

आरोग्य विभाग यांना सावधान करणे व त्यांच्यात समन्वय साधून उपाययोजना करण्याबाबत त्यांना मार्गदर्शन करणे.

११) गट संसाधन केंद्रांची लेखाविषयक माहिती तसेच त्यांच्या भौतिक व आर्थिक प्रगतीची माहिती केंद्र शासनाच्या IMIS वर भरणे. त्याचप्रमाणे गावे/वाड्या/वस्त्या यांची अद्ययावत माहीती IMIS वर भरण्याकरीता माहिंती गोळा करण्यासाठी यंत्रणेस मदत करणे.

गट संसाधन केंद्रांनी स्वतंत्र घटक म्हणून काम न करता राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन (NHRM), सर्व शिक्षा अभियान (SSA), राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (NREGS), एकात्मिक बाल विकास योजना (ICDS) यासारख्या अन्य योजनांच्या, गट पातळीवरील कर्मच्या-यांशी ताळमेळ ठेऊन काम करावे. या योजना तसेच पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग व अन्य कार्यक्रमांखालील प्रशिक्षण व IEC विषयक कार्यक्रमांची गट संसाधन केंद्रांच्या कार्यक्रमांशी योग्य सांगड घालण्यात यावी.

४. गट संसाधन केंद्रांमध्ये, एक गट समन्वयक (Block Co-ordinator) व आवश्यकतेनुसार, गाव समुह समन्वयक (Cluster Co-ordinator) असतील. यांची शैक्षणिक पात्रता, अनुभव व आर्थिक मोबदला पुढीलप्रमाणे असेल :

| अ.क्र. | पदनाम | किमान शैक्षणिक पात्रता व अनुभव | वयोमर्यादा | मासिक मोबदला/ मानधन | प्रवास भत्ता | मोबाईल/ दुरध्वनी भत्ता |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गट समन्वयक( Block Co-ordinator) | एम.एस.डब्ल्यु. किंवा प्रसिद्धी माध्यमे / समाज विज्ञान शास्त्रातील पदवीधर, ग्रामीण भागात, ग्रामीण पाणी पुरवठा समित्या, पाणी गुणवत्ता व सनियंत्रण, ग्रामीण स्वच्छता, आरोग्य विषयक कामाचा किमान दोन वर्षाचा अनुभव. | २५ ते ३५ वर्षे, माजी सैनिकांसाठी उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्षे. | रु.५,०००/- | रु.१५००/- दरमहा एकत्रीत | रु.१०००/- दरमहा |
| २ | समुह समन्वयक( Cluster Co-ordinator) | एम.एस.डब्ल्यु. किंवा प्रसिद्धी माध्यमे / समाज विज्ञान शास्त्रातील पदवीधर, ग्रामीण भागात, ग्रामीण पाणी पुरवठा समित्या, पाणी गुणवत्ता व सनियंत्रण, ग्रामीण स्वच्छता, आरोग्य विषयक कामाचा किमान एक वर्षाचा अनुभव. | २५ ते ३५ वर्षे, माजी सैनिकांसाठी उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्षे. | रु.४५००/- | रु.१५००/- दरमहा एकत्रीत | रु.१०००/- दरमहा |

गट संसाधन केंद्रांच्या कामांचे स्वरुप व गरज विचारात घेऊन, शासन, या केंद्रांवर नियुक्त करावयाच्या कर्मच्या-यांच्या शैक्षणिक पात्रतेत, अनुभवात तसेच त्यांना अदा करावयाच्या मानधनात वाढ करु शकेल.

**कर्मच्या-यांची संख्या-** गट/तालुक्याच्या लोकसंख्येच्या आधारे खाली नमुद केलेल्या प्रमाणात प्रत्येक गट संसाधन केंद्रामध्ये २ ते ४ कर्मचारी कार्यरत असतील .प्रत्येक गटातील ग्राम पंचायतींची २,३ किंवा ४ समुहांमध्ये (CLUSTERS) विभागणी करुन ते गट संसाधन केंद्रांच्या कर्मच्या-यांमध्ये वितरीत करण्यात यावे.

अ) सन २०११ च्या जनगणनेनुसार गटाची लोकसंख्या(७०,००० किंवा कमी) - २ कर्मचारी : १ गट समन्वयक व १ समुह समन्वयक

ब) सन २०११ च्या जनगणनेनुसार गटाची लोकसंख्या(७०,००० ते १.५ लक्ष) - ३ कर्मचारी : १ गट समन्वयक व २ समुह समन्वयक

vw- BRC

क) सन २०११ च्या जनगणनेनुसार गटाची लोकसंख्या(१.५ लक्ष पेक्षा अधिक) - ४ कर्मचारी : १ गट समन्वयक व ३ समुह समन्वयक

५. **गट संसाधन कर्मच्या-यांची निवड प्रक्रीया :**

गट संसाधन केंद्रांकरीता मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी महाराष्ट्र व्यावसायिकता विकास केंद्र (Maharashtra Centre for Entrepreneurship Development) (MCED) या राज्य शासनाच्या उपक्रमाकडे सोपविण्यात येत आहे. गट संसाधन केंद्रांकरीता मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याकरीता MCED मार्फत पात्र उमेदवारांची सुची (Empanelment) तयार करण्यात येईल. त्यासाठी सदर उपक्रम आणि पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्यामध्ये सामंजस्य करार (MoU) करण्यात येईल.

६. **गट समन्वयकाच्या व समूह समन्वयकाच्या जबाबदा-या :**

गट समन्वयक हा गट संसाधन केंद्राचा प्रमुख असेल. गट संसाधन केंद्रांच्या दैनंदिन खर्चाचा हिशोब ठेवणे ही त्याची खालील कामांबरोबरच अधिकची जबाबदारी असेल.समूह समन्वयक गट समन्वयकाच्या मार्गदर्शन व पर्यवेक्षणाखाली पुढील कामे पार पाडतील :

१) परिच्छेद क्र. ३ मध्ये नमुद कलेली गट संसाधन केंद्राची सर्व कार्ये पार पाडणे.

२) गट समन्वयक व समुह समन्वयक यांनी महिन्यातून किमान १० ते १५ दिवस नेमून दिलेल्या गावांना स्थळ-भेटी देणे आवश्यक आहे. या भेटीदरम्यान त्यांनी, रात्रीच्या मुक्कामासह गावांमधील सायंकालीन बैठकांना उपस्थित राहणे आवश्यक आहे. आठ तासांपेक्षा कमी स्थळ भेट ही अर्धा दिवस भेट समजण्यात येईल.

३) पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रात काम करीत असलेल्या विविध संस्था, यंत्रणा त्याचप्रमाणे पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या अधिका-यांशी समन्वय साधणे.

४) प्रत्येक गावांमध्ये ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांची स्थापना करणे, बँक खाते उघडणे इ.बाबींकरीता ग्रामसभांना मदत करणे.

५) पाणी पुरवठा योजनांची आखणी, अंमलबजावणी, संचालन, देखभाल दुरुस्ती, पाणी गुणवत्ता संनियंत्रण, पाणीपट्टीची आकारणी, स्वच्छता सुविधा याबद्दल ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती व ग्राम पंचायतींच्या सदस्यांना प्रशिक्षण देणे, त्यांना मदत करणे.

६) पिण्याच्या पाण्याच्या नमुन्यांची पाणी गुणवत्ता चाचणी प्रयोगशाळांमधून चाचणी करणे व त्याबाबतचा अहवाल ग्रामस्थ / ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती / ग्राम पंचायतीं यांना सादर करणे.

७) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिका-यांच्या सूचनांनुसार क्लोरीनच्या गोळ्यांचे वाटप करणे.

८) पिण्याचे पाणी व स्वच्छतेशी संबंधित आजार उद्भवल्यास त्यावर प्रतिबंधात्मक उपाय करण्यासाठी गट पातळीवरील अभियंते व आरोग्य अधिकारी यांच्याशी समन्वय साधून नियंत्रण मिळविण्यासाठी ग्राम पंचायत / समित्यांनी मदत करणे.

९) गावातील नाविन्यपूर्ण / यशस्वी उपक्रम व प्रकरणांचा अभ्यास यांचा दस्तऐवज तयार करणे.

१०) गट संसाधन केंद्राचे दैनंदिन लेखाविषयक बाबी हाताळणे

७. **गट संसाधन केंद्रांच्या कर्मचा-यांचे प्रशिक्षण :**

१) गट संसाधन केंद्रांच्या कर्मचा-यांची नियुक्ती झाल्यानंतर त्यांचे ज्ञान / माहिती अद्ययावत करण्यासाठी, त्यांची क्षमता बांधणी करण्यासाठी, कौशल्य विकसित करण्यासाठी ४ आठवड्यांचा प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येईल. राज्याची मुख्य संसाधन केंद्रे (Key Resource Centres) केंद्र शासनाच्या सर्वसाधारण प्रशिक्षण कार्यक्रमावर तसेच Training Needs Assessment वर आधारीत विभाग निहाय प्रशिक्षण कार्यक्रम तयार करतील. राज्य मुख्य संसाधन केंद्रानी प्रारंभिक प्रशिक्षणाचे (Induction Training) जिल्हास्तरावर आयोजन करावे. किमान दोन आठवड्यांच्या प्रारंभिक प्रशिक्षणामध्ये गावांमध्ये वास्तव्य व स्थळ प्रशिक्षण (On Field Training) यांचा समावेश असावा. गट संसाधन केंद्रांच्या कर्मच्या-यांचा कर्तव्य कालावधी प्रारंभिक प्रशिक्षणाच्या पहिल्या दिवसापासून सुरु होईल. जे प्रशिक्षणार्थी प्रारंभिक प्रशिक्षण यशस्वीरित्या पुर्ण करतील त्यांनाच कर्तव्यार्थ

बोलावण्यात यावे.गट संसाधन केंद्रांच्या कर्मच्या-यांना नवीन घडामोडींविषयी माहिती देण्यासाठी तसेच त्यांच्यात वर्तणुकीय बदल घडून यावेत यासाठी जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन मार्फत जिल्हा स्तरावर प्रत्येक महिन्यात आढावा - नी - उजळणी प्रशिक्षण (Review cum Refresher Training) आयोजित करण्यात येईल.

२) या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये ग्रामस्थांशी संवाद साधण्याचे त्यांचे कौशल्य विकसित करण्यावर भर देण्यात यावा. हे प्रशिक्षण अशा पद्धतीने तयार करण्यात यावे की त्यायोगे केंद्रांचे कर्मचारी पाणी गुणवत्ता संनियंत्रण व देखरेख यासह पाण्याच्या स्त्रोतांचा एकत्रित वापर (Conjunctive use) कसा करावा याबद्दल अवगत होतील. त्यांच्या मनाचा कल ग्रामस्थांच्या बाजूचा असावा व त्यासाठी त्यांना पंचायत राज संस्थांशी संवाद साधण्याचा पुरेसा वाव देण्यात यावा. प्रशिक्षणानंतर गट संसाधन केंद्रांचे कर्मचारी आरोग्य, आजारपण, वैयक्तिक व सामुदायिक स्वच्छता विषयक सवयी, सुरक्षित पिण्याचे पाणी, स्वच्छता, पाण्याची सुरक्षित हाताळणी, जलस्त्रोतांचे संरक्षण इ.मधील परस्पर संबंधांच्या मुलभूत घटकांचे स्पष्टिकरण करण्यास पुरेसे सक्षम होणे आवश्यक आहे. गट संसाधन केंद्रांच्या कर्मच्या-यांना पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रात सध्या रुढ असलेल्या कार्यपद्धतीची माहीती देण्यात यावी जेणे करुन ते त्याबद्दल ग्राम पंचायती / ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती /ग्रामीण जनता यांना अवगत करु शकतील.

## ८. गट संसाधन केंद्रांना आर्थिक सहाय्य :

गट संसाधन केंद्रांच्या कर्मचा-यांचे मानधन, आकस्मिक खर्च व कार्यक्रम यावरील खर्च राष्ट्रीय ग्रामीण पेय जल कार्यक्रमांतर्गत उपलब्ध होणा-या ५% सहाय्य निधीतून भागविण्यात येईल. राज्य शासन आवश्यकतेनुसार स्वतःच्या निधीतून गट संसाधन केंद्रांकरीता अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देईल. NGOs अथवा बाह्यस्थ संस्था (Outsourcing Agency) यांना मानधन / मोबदला अदा करण्यासाठी आणि गट संसाधन केंद्रांच्या कर्मच्या-यांना मानधन इ. अदा करण्यासाठी योग्य त्या स्तरावर पुरेसा निधी उपलब्ध असेल याची जिल्हा परिषदेचा ग्रामिण पाणी पुरवठा विभाग आणि / किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद यांनी खात्री करावी. संबंधितांना हे मानधन कोणत्याही परिस्थितीत प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेपर्यंत न चुकता अदा करण्यात यावे.

## ९. गट संसाधन केंद्रांची फलनिष्पत्ती (Outputs) :

खाली नमुद केलेल्या यश निर्देशकांच्या (Success Indicators) आधारे, राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन (SWSM) कडून प्रत्येक वर्षाच्या सुरुवातीस व शेवटी, प्रत्येक जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनला (DWSM) दिलेल्या लक्ष्यित परिमाणांचे मोजमाप करण्यात येईल. याच यश निर्देशकांच्या आधारे, जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन, प्रत्येक गट संसाधन केंद्राच्या लक्ष्यित परिमाणांचे मोजमाप करेल.

१) भेटी दिलेल्या गावांची संख्या.
२) सर्व गावांमध्ये स्थापन करण्यात आलेल्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांची संख्या.
३) बैंकांमध्ये खाते (with e-transfer facility) उघडण्यात आलेल्याग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांची संख्या.
४) ज्यामध्ये गट संसाधन केंद्रांचे कर्मचारी सहभागी झालेले आहेत व पिण्याचे पाणी, स्वच्छता व आरोग्य शास्त्र याबद्दल चर्चा केली आहे अशा ग्रामसभांची संख्या.
५) भेटी दिलेल्या व जनजागृती बद्दल व्याख्यान दिलेल्या शाळांची संख्या.
६) भेटी दिलेल्या अंगणवाड्यांची व कार्यक्रमाविषयी जाणिव निर्माण करण्यात आलेल्या कर्मच्या-यांची संख्या.
७) ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे सदस्य / ग्राम पंचायतींचे सदस्य / ग्राम पातळीवरील इतर कर्मचारी यांच्याकरीता गाव व गट पातळीवर आयोजित करण्यात आलेल्या मनुष्य दिवस प्रशिक्षणांची संख्या.

८) किट्सद्वारे पाणी गुणवत्ता चाचणी केलेल्या गावांची संख्या, पिण्याच्या पाण्याच्या सर्व स्त्रोतांच्या केलेल्या चाचण्यांची संख्या (पिण्याच्या पाण्याच्या प्रत्येक स्त्रोताची वर्षातून किमान दोन वेळा चाचणी करावयाची आहे.)

याशिवाय SWSM/DWSM/Outsourcing Agency आवश्यकतेप्रमाणे गट संसाधन केंद्राच्या मुल्यमापनाच्या निकषात बदल करु शकतील.

१०. **जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनची भूमिका :**

जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनने गट संसाधन केंद्रांच्या एकूण सर्व कामांचे व कार्यक्रमांचे संनियंत्रण करावे व त्यांना आवश्यक मार्गदर्शन करावे. जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनने राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, संपुर्ण स्वच्छता अभियान, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन, सर्व शिक्षा अभियान, एकात्मिक बालविकास योजना इ. कार्यक्रमाखालील माहिती, शिक्षण व संवाद (IEC) व प्रशिक्षण कार्यक्रमांचे एकत्रीकरण / विलिनीकरण करावे जेणे करुन या विविध कार्यक्रमांतर्गत दिल्या जाणा-या संदेशांमध्ये सुरक्षित पिण्याचे पाणी, परिसर स्वच्छता, वैयक्तिक आरोग्य / स्वच्छता, आणि पोषण यांच्याशी संबंधित बाबी त्यामध्ये अंतर्भूत होतील. जिल्हा मिशनने गट संसाधन केंद्रांच्या कर्मच्या-यांचे प्रशिक्षण, प्रशिक्षण साहित्य, IEC साहित्य इ.बद्दल खात्री करावी. पंचायत समिती व जिल्हा मिशनने मंजूर केलेल्या वार्षिक कृती आराखड्यानुसार गट संसाधन केंद्रांनी मासिक कृती आराखडा तयार करुन नोटीस बोर्डावर लावावा.

११. **राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनची भूमिका :**

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाचा एक प्रमुख उद्देश पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रामधील पंचायतींची भूमिका बळकट करणे हा आहे. यासाठी राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनला गट संसाधन केंद्रांच्या प्रशासकीय संरचनेत योग्य ते फेरबदल करण्याचे अधिकार असतील. गट संसाधन केंद्रांकरीता प्रारंभिक प्रशिक्षण (Induction Training) कार्यक्रम व उजळणी (Refresherr Training) कार्यक्रम तयार करणे ही कामे राज्य मिशनमार्फत यशदा किंवा मुख्य संसाधन केंद्रांना (KRCs)देण्यात येतील. गट संसाधन केंद्राच्या कर्मच्या-यांच्या निवडीनंतर १५ दिवसात त्यांचे प्रारंभिक प्रशिक्षण सुरु करण्याकरीता राज्य मिशन प्रारंभिक प्रशिक्षण कार्यक्रमास मंजूरी देईल. राज्य मिशन सहाय्य निधीमधून जिल्हा मिशनला निधी वितरीत करेल व निधीच्या वापराबद्दल सविस्तर सुचना देईल. सहाय्य निधीच्या मर्यादेत राज्य मिशन प्रत्येक गट संसाधन केंद्रांचे कर्मचारी, आकस्मिक खर्च व इतर कामांसाठी नियत व्यय निश्चित करेल. गट संसाधन केंद्रांनी भौतिक व आर्थिक प्रगती अहवाल, खर्चाचे विवरण पत्र, उपयोगीता प्रमाणपत्र सादर करण्यासंदर्भात राज्य मिशन सविस्तर सुचना निर्गमित करेल, जेणे करुन राज्य मिशनला उपयोगीता प्रमाणपत्रे / अंकेक्षित लेखा विवरणपत्रे व कार्यक्रमविषयक अहवाल अंतिम करुन ते सहाय्य निधीकरीता केंद्र शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास सादर करता येतील.

१२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब-साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक **सांकेतांक २०११०७०६१६५३५९००१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(शैला ए. )**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

मा.मुख्य मंत्री, महाराष्ट राज्य यांचे खाजगी सचिव
मा.उप मुख्य मंत्री, महाराष्ट राज्य यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री(पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव,

मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा.राज्य मंत्री(पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्य मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य
सर्व विभागीय आयुक्त,
सदस्य सचिव,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई
संचालक,भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे,
मुख्य कार्यकारी अधिकारी,सर्व जिल्हा परिषदा
मुख्य अभियंता, राज्यस्तरीय भारत निर्माण कक्ष, नवी मुंबई
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व प्रादेशिक उपसंचालक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,
सर्व अधिक्षक अभियंता, विभागीय भारत निर्माण कक्ष
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
कार्यकारी अभियंता, ग्रामिण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद (सर्व)
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
महालेखापाल,महाराष्ट्र - १ मुंबई(लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल,महाराष्ट्र - २ नागपूर (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परिक्षक,स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
उप मुख्य लेखा परिक्षक,स्थानिक निधी लेखा, नाशिक,पुणे,औरंगाबाद,अमरावती व नागपूर
सर्व गट विकास अधिकारी,पंचायती समिती
नियोजन विभाग,मंत्रालय,मुंबई
वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय,मुंबई
पाणी पुरवठा विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवड नस्ती,पापु-०७

केंन्द्र पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन (DWSM) स्थापन करण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
**शासन परिपत्रक** क्रमांकः ग्रापाधो १११०/ प्र. क्र. २४६ (अ)/पापु-०७,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दि. १५ जुलै,२०११
वाचावे-शा. नि.,पा.पु.व स्व.वि.ग्रापाधो १११०/प्र.क्र.१७५ ब/पापु ०७,दि.१०/०२/२०११

**प्रस्तावनाः**

केंद्र शासनाने १ एप्रिल २००९ पासून राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (NRDWP) अंमलात आणलेला आहे. त्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना केंद्र शासनाकडून निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ग्राम स्तरावरील पाणी पुरवठा योजनांचे नियोजन, अंमलबजावणी व देखभाल दुरुस्तीची संपूर्ण जबाबदारी ग्राम स्तरावर सोपविण्यात आलेली आहे. राज्य शासन व पंचायत राज व्यवस्थेमधील जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्या भूमिक देखील मार्गदर्शक सूचनांमध्ये स्पष्ट करण्यात आलेल्या आहेत. या कार्यक्रमामध्ये केंद्र शासनाच्या सूचनांनुसार संदर्भाधिन शासन निर्णयान्वये राज्यस्तरावर पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनचे (SWSM) गठन करण्यात आलेले आहे. तसेच जिल्हा स्तरावर जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन **(DWSM)**, गट स्तरावर गट संसाधन केंद्र(BRCs) व ग्राम स्तरावर ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांच्या भूमिका देखील मार्गदर्शक सूचनांमध्ये स्पष्ट करण्यात आलेल्या आहेत.केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्हा स्तरावर जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनसाठी **(DWSM)** सल्लागारांची / तज्ञांची नियुक्ती करण्यासंदर्भात सुचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचारात होती.

**शासन परिपत्रक :-**

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यातील जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनकरीता प्रत्येक जिल्ह्यात खालीलप्रमाणे सल्लागार / तज्ञांची नियुक्ती करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.सदर पदे ही कंत्राटी पध्दतीने भरण्यात यावी.

| अ. क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता व अनुभव | थोडक्यात कार्ये | आर्थिक मोबदला |
|---|---|---|---|---|
| १ | माहिती शिक्षण व संवाद आणि समानता सल्लागार (IEC & Equity Consultant) १ पद | **किमान अर्हता-** मास कम्यूनिकेशन अथवा जर्नालिझम मधील किमान ६०% गुणांसह पदवी<br>**प्राधान्य** -पदव्यूत्तर पदवी<br>संगणकाचे -MS-Office /Photo Shop / Corol Draw बाबत ज्ञान असल्यास प्राधान्य. **अनुभव** - स्वयंसेवी संस्था अथवा शासकीय विभागामधील पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रातील कामाबाबत जिल्हास्तरावरील २ वर्षाचा अनूभव आवश्यक,<br>**प्राधान्य** जलस्वराज्य अथवा तत्सम सहभागात्मक विकासाच्या कार्यक्रमामधील जिल्हास्तरावरील अनूभव असल्यास प्राधान्य | माहिती शिक्षण व संवाद यांचे आराखडे बनवून अंमलबजावणी करणे व त्यांचे संनियत्रण करणे | रु.१५,०००/- दरमहा |
| २ | मुल्यमापन व MIS सल्लागार (Monitorin g ,Evaluation cum MIS Consultant) १ पद | **किमान अर्हता-** कोणत्याही विषयातील पदवी किमान ६०% गुणांसह व संगणकाचे ज्ञान-MS-Office.<br>**प्राधान्य** - गणित / संख्याशास्त्रामधील पदवी ,<br>Advance Diploma course in Computer (Data Bank Management) किंवा तत्सम .<br>**अनुभव** - स्वयंसेवी संस्था अथवा शासकीय विभागामधील M.I.S. व सनियंत्रणाबाबत जिल्हास्तरावरील २ वर्ष चा अनूभव.<br>ऑनलाईन संगणक प्रणालीबाबत अनूभव .<br>**प्राधान्य** -जलस्वराज्य अथवा तत्सम सहभागात्मक विकासाच्या कार्यक्रमामधील जिल्हास्तरावरील अनूभव असल्यास प्राधान्य | प्रगतीचे मूल्यमापन, सनियंत्रण आणि I.M.I.S. भरणे व त्यांचे विश्लेषण करणे | रु.१५,०००/- दरमहा |
| ३ | मनुष्यबळ विकास सल्लागार (HRD Consultant) १ पद | **किमान अर्हता-** कोणत्याही विषयातील पदवी अधिक MSW अथवा B-Tech / BE किंवा MBA,<br>संगणकाचे -MS-Office बाबत ज्ञान आवश्यक.<br>**अनुभव** - स्वयंसेवी संस्था अथवा शासकीय विभागामधील पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रामधील प्रशिक्षणांचे नियोजन व अंमलबजावणी बाबत २ वर्षाचा अनूभव ,. | प्रशिक्षण व क्षमता बांधणी कार्यक्रम एकत्रीतपणे राबविणे,कृती आराखडा तयार करुन त्यास मंजूरी देणे,कृती आराखड्याची अंमलबजावणी, सनिंयत्रण व | रु.१५,०००/- दरमहा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | विविध भागधारकांच्या गरजांनूसार प्रशिक्षणांचा कार्यक्रम तयार करण्याबाबत अनूभव .<br>**प्राधान्य -** क्षमता बांधणी कार्यक्रमामधील अनूभव विशेषत: जिल्हा व ग्रामस्तरावरील . जलस्वराज्य अथवा तत्सम सहभागात्मक विकासाच्या कार्यक्रमामधील जिल्हास्तरावरील अनूभव असल्यास प्राधान्य. | मुल्यमापन करणे, Feedback देणे. | |
| ४ | पाणी गुणवत्ता तज्ञ (Water Quality Monitoring & Surveillance Specialist), १ पद | **किमान अर्हता-** Environmental Chemistry/Analytical Chemistry/Geo-Chemistry/Microbiology यामधील पदवी.<br>**प्राधान्य** - M.Sc. in Water Quality Monitoring & Surveillance,<br>**अनुभव-** पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षण यामधील किमान २ वर्षांचा अनुभव.<br>- Good knowledge of MS office,Excel,Internet & working experience in water quality testing instrumentation.<br>- Excellent written and oral communication skill in English,Knowledge of local language is an added advantage. | पाणी गुणवत्ता सेनियंत्रण व सर्वेक्षणाशी संबंधित सर्व बाबी हाताळणे | रु.१५,०००/- दरमहा |
| ५ | वित्त नि संपादणूक अधिकारी (Finance cum Procurement Officer)१ पद | **किमान अर्हता-** वाणिज्य शाखेतील पदवी किमान ५५ टक्के गुणांसह, MS-CIT<br>**प्राधान्य-** M.Com,Tally-९<br>**अनुभव-**२ वर्ष स्वयंसेवी संस्था अथवा शासकीय विभागामध्ये<br>**प्राधान्य** जलस्वराज्य अथवा तत्सम सहभागात्मक विकासाच्या कार्यक्रमामधील जिल्हास्तरावरील अनूभव असल्यास प्राधान्य. | पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी करणा-या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांची लेखापुस्तके तपासणे,त्यांना निविदा कार्यपद्धतीबाबत सल्ला देणे. | रु.१५,०००/- दरमहा |

**वयोमर्यादा-** सर्व पदांसाठी उच्चतम वयोमर्यादा ४० वर्ष राहील.

**कर्मचारी निवड पद्धती-**

सल्लागारांच्या निवडीसाठी जिल्हास्तरावर खालील प्रमाणे निवड समिती स्थापन करण्यात यावी-

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अध्यक्ष

२. विभागीय आयुक्त यांचे प्रतिनिधी — सदस्य

३. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) — सदस्य

४. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) — सदस्य

५. जिल्हा आरोग्य अधिकारी — सदस्य

६. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा — सदस्य सचिव

वरील पदांसाठी उमेदवारांची निवड करण्याकरिता जिल्हा स्तरावरुन सर्वाधिक खपाच्या एक मराठी व एक इंग्रजी दैनिक वृत्तपत्रात(जोडपत्र-१ प्रमाणे) संक्षिप्त जाहिरात द्यावी. तसेच जिल्ह्याच्या वेबसाईटवर देखील जाहीरात प्रसिध्द करण्यात यावी.(जोडपत्र-२ प्रमाणे) या जाहिरातीस अनूसरुन उमेदवारांनी त्यांचे अर्ज विहित नमुन्यात(जोडपत्र-३ प्रमाणे))जिल्हा परिषदेच्या मूख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सादर करणे आवश्यक राहील.

प्राप्त झालेल्या अर्जांच्या छाननीनंतर पात्र ठरलेल्या उमेदवारांसाठी एकूण ६० गुणांची बहुपर्यायी वस्तुनिष्ठ लेखी परिक्षा व २५ गुणांची तोंडी परिक्षा खालीलप्रमाणे ठेवण्यात यावी.

**लेखी परिक्षा**

| विषय | गुण |
|---|---|
| सामान्य ज्ञान | १० गुण |
| बौद्धिक व विश्लेषणात्मक क्षमता | १० गुण |
| गणितीय क्षमता | १० गुण |
| विषयाचे ज्ञान | १० गुण |
| संगणकाचे ज्ञान | ५ गुण |
| स्थानिक बाबींचे ज्ञान | ५ गुण |

एकूण प्रश्न-६०,एकूण गुण -६०,परिक्षेचा कालावधी- १ तास

**तोंडी परिक्षा-**

| विषय | गुण |
|---|---|
| किमान शैक्षणिक अर्हता | ५ गुण(टक्केवारीनुसार) |
| उच्च शैक्षणिक अर्हता | ५ गुण(टक्केवारीनुसार) |
| अनुभव | १० गुण |
| व्यक्तीमत्व | ५ गुण |
| एकूण गुण | २५ |

लेखी परिक्षेमधून एकास पाच ( सर्वोच्च गुण मिळविणारे पाच उमेदवार ) या प्रमाणात उमेदवारांना मुलाखतीसाठी आमंत्रित करण्यात यावे.

लेखी परिक्षच्या प्रश्नपत्रीका तयार करुन उत्तरपत्रीका तपासण्याची जबाबदारी जिल्हा निवड समितीची राहील.उत्तर पत्रिकांची तपासणी शक्यतो संगणकीय पद्धतीने (OMR) करावी.लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिकांची गोपनियता अबाधित राखणे ही मुख्य कार्यकारी अधिका-यांची वैयक्तीक जबाबदारी राहील.

पदभरतीचा कार्यक्रम-

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १. | वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करणे | २९ जुलै,२०११ |
| २. | अर्ज करण्याची शेवटची तारिख | १२ ऑगस्ट,२०११ |
| ३. | पात्र / अपात्र उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे | २६ ऑगस्ट,२०११ |
| ४. | पात्र/अपात्र उमेदवारांच्या यादीवर आक्षेप घेण्याची शेवटची तारीख | ०३ सप्टेंबर,२०११ |
| ५. | आक्षेपावर निर्णय घेणे | ०६ सप्टेंबर,२०११ |
| ६. | उमेदवारांना प्रवेश पत्र पाठविणे | ०९ सप्टेंबर,२०११ |
| ७. | लेखी परिक्षा | २५ सप्टेंबर, २०११ |
| ८. | लेखी परिक्षेचा निकाल जाहिर करणे | २७ सप्टेंबर,२०११ पर्यंत |
| ९. | मौखिक परिक्षा | २८ सप्टेंबर,२०११ |
| १०. | अंतिम गुणवत्ता यादी प्रसिद्ध करणे | मौखिक परिक्षेनंतर तात्काळ |
| ११. | यशस्वी उमेदवारांना नियुक्ती पत्र देणे | २९ सप्टेंबर,२०११ |

प्रत्येक विभागातील निवड प्रक्रियेबाबत संनिंयंत्रण व विहीत कालावधीमध्ये सदरची प्रक्रिया पूर्ण करण्याची जबाबदारी विभागस्तरावरील अधिक्षक अभियंता (भारत निर्माण) यांच्याकडे राहील. राज्यस्तरावरील सनियंत्रण अधिक्षक अभियंता (भारत निर्माण कक्ष) यांच्याकडे राहील.

उपरोक्त पदे ही खुल्या बाजारातून कंत्राटी पध्दतीने ११ महिन्याकरीता भरण्यात यावी.त्यांचे वेतन व भत्ते केंद्र शासनाकडून राष्ट्रिय ग्रामिण पेयजल कार्यक्रमांतर्गत राज्य शासनास प्राप्त होणा-या सहाय्य निधीतून (Support Fund) अदा करण्यात येतील.त्यासाठी जिल्ह्याकडून मागणी आल्यानंतर या विभागातील पापु-१० कार्यासनामार्फत संबंधित जिल्ह्यांना निधी वितरित करण्यात येईल.

वरिलप्रमाणे नियुक्त करण्यात आलेल्या सल्लागारांशी जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी विहित नमुन्यात(जोडपत्र-४)करार करतील. नियुक्तीनंतर सदर सल्लागार मुख्य कार्यकारी अधिका-यांच्या संनियंत्रणाखाली कार्यरत राहतील.कार्यकारी अभियंता,ग्रामिण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद हे त्यांच्या दैनंदिन कामाचे संनियंत्रण करतील.मुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामिण पाणी पुरवठा कार्यक्रमाशी संबंधित मासिक आढावा बैठकीमध्ये या सल्लागारांच्या कामाचा आढावा घेतील मुख्य

कार्यकारी अधिका-यांनी हा मासिक आढावा केंद्र शासनाने जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनच्या मासिक बैठकीसाठी तयार केलेल्या कार्यक्रमपत्रिकेनुसार घ्यावा.

राज्यस्तरावरून संचालक,राज्य पाणी पुरवठा व सहाय्य संस्था (WSSSO) हे त्यांच्या कामाचा नियमित आढावा घेतील.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी वेळोवेळी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने आवश्यक आदेश निर्गमित करण्याचे अधिकार तसेच कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबत काही अडचणी निर्माण झाल्यास त्यांचे वेळोवेळी निरसन करण्याचे अधिकार राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनमधील प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता यांच्या अध्यक्षतेखालील कार्यकारी समितीला असतील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब-साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०११०७१५११५३३२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(शैला ए.)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

| | |
|---|---|
| प्रत,<br>मा.मंत्री(पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव,<br>मा.राज्य मंत्री(पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव,<br>सर्व विभागीय आयुक्त,<br>सर्व विधान सभा/विधानपरिषद सदस्य<br>सदस्य सचिव,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई<br>संचालक,भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे,<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,सर्व जिल्हा परिषदा<br>सर्व अधिक्षक अभियंता,विभागीय भारत निर्माण कक्ष<br>सर्व कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,<br>सर्व कार्यकारी अभियंता,ग्रामिण पाणी पुरवठा विभ ाग,जिल्हा परिषद<br>महालेखापाल,महाराष्ट्र - १ मुंबई(लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)<br>महालेखापाल,महाराष्ट्र - २ नागपूर (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता) | मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई<br>उप मुख्य लेखा परिक्षक,स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे औरंगाबाद, अमरावती व नागपूर<br>सर्व प्रादेशिक उपसंचालक,भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,<br>सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण<br>मुख्य अभियंता,भारत निर्माण कक्ष,नवी मुंबई<br>सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा<br>सर्व गट विकास अधिकारी,पंचायती समिती<br>नियोजन विभाग,मंत्रालय,मुंबई<br>वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई<br>ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय,मुंबई<br>पाणी पुरवठा विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने<br>निवड नस्ती,पापु-०७ |

# जोडपत्र-१

(शासन परिपत्रक क्र. ग्रापाधो १११०/ प्र. क्र. २४६ (अ)/पापु-०७,, दिनांक १५ जूलै, २०११ चे जोडपत्र १)

**Draft to be published in newspapers.**
**Chief Executive Officer, Zilla Parishad-------**

Appointments

No.-

Water Supply & Sanitation Department Govt. of Maharashtra is implementing National Rural Drinking Water Programme in 33 districts of the state. The following positions are **required on contract basis** at the District level (Zilla Parishad) in the Programme .

- **IEC& Equality consultant. ( 1 Post)**
- **Evaluation cum MIS consultant. ( 1 Post)**
- **HRD consultant. ( 1 Post)**
- **Water Quality Monitoring and Surveillance Specialist ( 1 Post)**
- **Finance cum Procurement Officer ( 1 Post)**

The details like qualification, experience, age limit, emoluments, are available on the web site: http://www.mahawssd.gov.in as well as on District web-site.The interested candidates should send their C.V. in the prescribed Proforma **only through post / hand delivery** so as to reach the office of the Chief Executive Officer of Zilla Parishad----- (Rural water supply department ) **by 12/8/2011** up to 5.00 P.M. .

**Chief Executive Officer**
**Zill Parishad.**
**Date :**

**Note-This draft is only indicative.The concerned Zill Parishads may make necessary changes as per their requirement and as per the provisions in circular.**

G:\DWSM GR.doc

## जोडपत्र-२

(शासन परिपत्रक क्र. ग्रापाधो १११०/ प्र. क्र. २४६ (अ)/पापु-०७,, दिनांक १५ जूलै, २०११ चे जोडपत्र २)

Draft - to be put on web site.

## Programme description

### Programme Vision

Safe drinking water for all, at all times, in rural areas.

### Programme Objectives

- To ensure permanent drinking water security in rural areas.
- To ensure drinking water security through measures to improve/augment existing drinking water sources and conjunctive use of groundwater, surface-water and rainwater harvesting based on village water budgeting and security plan prepared by The community/local government.
- Delivery of services by the system for its entire design period of quality of water in conformity with the prescribed standards at both the supply and consumption Points.
- Issue of potability, reliability, sustainability, convenience, equity and consumers Preference to be the guiding principles while planning for a community based Water supply system

The Programme envisages planning, implementation and operation & maintenance of the water supply scheme at the Gram Panchayat level through community participation. At the District level the District Water Supply & Sanitation Mission will be responsible for overall implementation of the Programme. The institutional set up at the District level will include the existing rural water supply department of the Zilla Parishad and the Total Sanitation Implementation